## प्रकरण - दुसरे

# प्रकरण - दुसरे

## प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा परिचय

**प्रस्तावना -**

आजपर्यंत झालेल्या कोणत्याही मोठया व्यक्तींच्या चरित्रांचा बारकाईने अभ्यास केला तर असे दिसते की, कोणतीही व्यक्ती जन्मतःच परिपूर्ण असत नाही. त्या व्यक्तीच्या जन्मदात्या आई-वडिलांनाही 'ती पुढे मोठी व्यक्ती होईल' असे छातीठोकपणे सांगता येत नाही. त्या व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या कर्तृत्वाला प्रचलित काळ आणि त्या काळात प्रचलित असलेली सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक परिस्थिती यामुळेच गती मिळते. यातूनच त्या व्यक्तीची जीवननिष्ठा तयार होते. त्या व्यक्तीच्या कार्यावर त्या काळाचा ठसा उमटलेला असतो. म्हणून त्या व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन करताना देखील त्या काळातील परिस्थितीचे भान ठेवावे लागते. सामान्य माणूस काळाच्या प्रवाहात प्रवाहाच्या दिशेने वाहून जातो. त्याची वार्ता कोणी ठेवत नाही. पण काळाच्या प्रवाहात उलटे पोहणारे महाभाग, स्वतःच्या आचार - विचारांचा, कर्तृत्वाचा ठसा काळाच्या पटलावर कोरुन ठेवतात. आणि विचारांचे हे कोरीव लेख व्दीप-स्तंभाप्रमाणे येणा-या पिढीला मार्गदर्शक ठरतात. व्यक्ती, काल, परिस्थिती आणि समाजजीवन हयांचा अनोन्य संबंध असतो. या संबंधातूनच व्यक्तीच्या चरित्राचा अभ्यास करणे योग्य ठरते. आणि याच दृष्टीने नलगेंच्या संक्षिप्त चरित्राचा आपणासही विचार करावा लागेल. सन 1960 नंतर ग्रामीण साहित्यात आनंद यादव, रा. रं. बोराडे या लेखकाबरोबरच चंद्रकुमार नलगे यांचे साहित्य मोठया प्रमाणात समाजासमोर येत आहे. त्यांच्या या ग्रामीण साहित्यातून ग्रामीण जीवनाचे फार जवळून दर्शन घडवले जात आहे.

चंद्रकुमार नलगे यांनी आपल्या प्रभावी विचारांनी ग्रामीण समाज जीवनाला निराळे वळण देण्याचा प्रयत्न केला आहे. नलगे यांनी ग्रामीण जीवनाचा फार जवळून अभ्यास केला आहे. त्यांनी आपल्या ग्रामीण साहित्यातून जे विचार मांडले आहेत त्याचा उपयोग नवीन पिढीसाठी नक्कीच होईल यात मात्र शंका नाही.

प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा जवळून परिचय करुन घेण्याच्या उद्देशाने दि.11/7/1994 रोजी

त्यांची मुलाखत घेण्यात आली. या त्यांच्या प्रत्यक्ष भेटीतून व्यक्ती म्हणून आणि लेखक म्हणून परिचय करण्यात आला तसेच त्यांच्या लेखन प्रवासाचा आलेखही पाहण्यात आला. (1)

**प्रा. नलगेंचे बालपण -**

चंद्रकुमार नलगे यांचा जन्म भेडसगाव ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर या गावी झाला, त्यांचे पूर्ण नांव श्री. नामदेव चंद्राप्पा नलगे हे आहे. त्यांचा जन्म 22 फेब्रुवारी 1935 रोजी झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. मराठी आहे. तसेच साहित्य विशारद, प्रवीण (हिंदी) यांचाही त्यांनी अभ्यास केला आहे. ते सध्या श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर येथे नोकरी करत आहेत.

नलगे यांनी ग्रामीण साहित्याचा फार जवळून अभ्यास केला आहे. त्यांनी सतत ग्रामजीवनाविषयी आपले विचार विविध साहित्यात मांडण्याचा सतत प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे विविध साहित्याचे वाचन त्यांनी केले आहे. त्यांनी बालपणी रामायण, महाभारत, पांडवप्रताप, शिवलीलामृत इ. ग्रंथाचे वाचन त्यांनी केले. साने गुरुजींच्या साहित्याचे वाचन त्यांनी केले. परंतु नलगे यांना श्री. म. माटे यांच्या साहित्याच्या वाचनाने लेखनास प्रेरणा मिळाली.

नलगेंना ग्रामीण चित्रणाची ओढ होती. ग्रामीण जीवनाचे चित्रण त्यांनी आपल्या लिखाणानें साहित्यात आणण्याचा प्रयत्न केला. म. फुले, डॉ. आंबेडकरांच्या चळवळींचाही परिणाम नलगे यांच्या साहित्यांवर झाला आहे. तसेच नलगे यांचे अकरा कथासंग्रह प्रसिध्द आहेत. सुमारे 150 कथा प्रसिध्द आहेत. नलगे यांना ग्रामीण जीवन जगत असता जे अनुभव आले त्याचे चित्रण त्यांच्या साहित्यात आले आहे. 'दिंडी' हा नलगे यांचा काव्यसंग्रह प्रसिध्द आहे. या काव्यसंग्रहातील 105 कविता प्रसिध्द झाल्या आहेत. त्यांनी आपल्या ग्रामीण जीवनाचे दर्शन, भावनांचे, स्पंदनांचे चित्रण आपल्या साहित्यातून केले आहे. सामाजिक व्यंगावर प्रकाश टाकणारे साहित्य त्यांनी निर्माण केले आहे.

चंद्रकुमारांचे बालपण भेडसगांव येथे खेडेगावात गेले. त्यांच्या आठवणी खूप आहेत. त्या म्हणजे 'गावाकडची माती, चंद्रबनातल्या सावल्या, मंतर कैफ व झुंझरुक' या ललित पुस्तकांमधून चित्रित केलेल्या आहेत. तसेच त्यांना इयत्ता सातवीला असल्यापासून लेखन करण्याचा छंद होता.

इयत्ता नववीला असताना 'गळफास' या नाटिकेचे प्रकाशन व त्यास शासनाचे पारितोषिक मिळाले, नलगे यांनी अनेक अशा पौराणिक ग्रंथाचे वाचन केले आहे. इयत्ता चवथी ला असल्यापासून वाचन त्यांनी अव्याहत चालू ठेवले आहे.

साने गुरुजी, श्री. म. माटे, अण्णाभाऊ साठे, म. फुले व डॉ. आंबेडकर यांचे लेखन त्यांनी केले. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, शंकर पाटील, माडगूळकर, शिवाजीराव सावंत यांच्यावरहि त्यांनी लेख लिहिले आहेत.

नलगे यांचे कॉलेजमधील दिवस साहित्य निर्मितीच्या बाबतीत चांगले गेले. अनेक प्रकारचे लेखन त्यांनी केले आहे. नलगे यांचे कॉलेजचे शिक्षण बाहेरुन झालेले आहे. प्राथमिक शिक्षक म्हणून तेरा वर्षे काम केले. तेव्हाच हे एम. ए. झाले, नंतर प्राध्यापक झाले. या काळात पाच पुस्तके त्यांनी लिहिली. दोन पुस्तकांना बक्षिसे मिळाली आहेत. त्यांच्या अंगाई या कथेवर चित्रपट निर्माण झाला आहे.

सुदर्शन, राजहंस, स्वराज्य, सा. गावकरी, महाद्वार इ. लेखान त्यांनी केले. माटे, माडगूळकर, शंकर पाटील, शंकरराव खरात, साठे या ग्रामीण लेखकाचा प्रभाव त्यावेळी नव्हता, पण त्यांच्या साहित्याचे वाचन मोठया प्रमाणात त्यांनी केले होते. ग्रामीण भाषेचे स्थान ग्रामीण जीवनात अपरिहार्य आहे. ग्रामीण जीवनदर्शन ग्रामीण भाषेशिवाय वास्तव तसेच ते जीवंत होणार नाही, असे नलगे यांना वाटते.

नलगेंचे बालपण हे अतिशय कष्टात गेले. नलगेंच्या घरची गरीबी हे एक त्याचे महत्वाचे कारण होय. शेतीवर काम करत करत त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले. हायस्कूल शिक्षणासाठी नदीच्या पुरातून, चिखलातून, थंडी वा-यातून पाच ते सहा मैलाचा रोज पायी प्रवास करावा लागत असे. अशा कष्टदायक परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले आहे. नलगे मॅट्रिकला बत्तीस शिराळा येथे शिकण्यास होते. बोर्डिंगमध्ये राहून पण हाताने जेवण करुन त्यांनी शिक्षण घेतले. नंतर तर नोकरी जंगल्यासारख्या भागात करुन ते बी.ए. व एम. ए. झाले.

## प्रा. नलगे यांची वैचारिक भूमिका :-

### शैक्षणिक विचार :-

नलगे यांचे शैक्षणिक विचार लक्षात घेताना ते असे म्हणतात की, ध्येयवादी शिक्षकांशिवाय शिक्षण संस्कार चांगले होणार नाहीत. इमारती शिक्षण संस्था यांचा वापर करण्याऐवजी त्यात रमणारा शिक्षक योग्य असावा, स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षकाने ध्येयवादी असणे म्हणजे व्यवहारशून्य असणे हे मानायचे कारण नाही. आज शिक्षकाला पोटापुरते मिळते, त्यांच्या गरजा भागतात म्हणूनच अतिरिक्त ऐहिक सुखांचा हव्यास न धरता विद्यार्थ्यांना शिक्षण दयावे. शिक्षक हे ध्येयवादी तसेच उच्च आकांक्षा बाळगणारे असावेत.

### राजकीय विचार :-

नलगे म्हणतात की, निरपेक्ष वृत्तीने मानवी सेवा म्हणून कार्य करणारे लोकच राष्ट्र उन्नत करतील, असे नलगेंचे राजकीय विचार आहेत. राजकारणाचा वापर आज संपत्ती गोळा करण्यासाठी होतो. राजकारण मनात स्वार्थी हेतू ठेवूनच करायचं असतं अशी लोकांची समजूत पूर्ण चुकीचे आहे. समाजावर निरपेक्ष प्रेम करण्या-या माणसानींच राजकारण करावे.

### धार्मिक विचार :-

समभाव हाच सर्वात महत्वाचा मानला आहे. सर्व लोकांनी एकाच विचाराने व एकाच धर्माचे आपण सर्व आहोत ही भावना त्यांनी आपल्या धार्मिक विचारात मांडलेली दिसून येते. समभावाने प्रत्येक व्यक्तीने राहावे व आपले जीवन समभाव दृष्टीने उजळवून टाकावे. धर्मा-धर्मामध्ये कोणत्याच प्रकारचा भेदभाव मानू नये. हे विचार प्रत्येक माणसाच्या मनात रुजवले पाहिजेत. समत्वाच्या दृष्टीने व वृत्तीने जर प्रत्येक व्यक्ती राहिली तर धर्माची भांडणे राहणार नाहीत. मानवता हाच एक धर्म आहे. धर्मा-धर्मात भेदभाव न करता माणसाने आपले जीवन व्यथित करावे. तरच समाजात सुख व शांती निर्माण होईल. सर्वांना समाजात समान अशा प्रकारची वागणूक मिळाली पाहिजे. तरच समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होईल. निरनिराळया धर्मातील प्रत्येक माणसाला न्याय, समता व बंधुतेची वागणूक दिली पाहिजे. तरच समाजात स्थैर्य प्रस्थापित होईल. प्रत्येक व्यक्तीची दृष्टी ही निरपेक्ष असावी. ती ध्येयवादी व्यक्ती असावी. प्रत्येक व्यक्तीकडे धर्मनिरपेक्षता, सहिष्णूता, मानवता हे गुण असावेत.

प्रत्येक व्यक्ती जीवनाच्या सर्व क्षेत्रात वावरु लागली तर धर्मकलह निर्माण होणार नाही. माणूस, माणुसकी आणि मानवता हा सामान्य माणसाच्या जीवनाच्या स्थायी भाव असतो. त्यांचाच विकास झाला पाहिजे, असे नलग्यांना वाटते.

**आर्थिक विचार :-**

नलगे म्हणतात जर स्वार्थाचे निर्मूलन झाले, तरच समाजातील सर्व लोक समान पातळीवर येऊ शकतील. त्यानी ज्ञानेश्वरांचे विचार स्पष्ट केले आहेत. ज्ञानेश्वर म्हणतात 'दुष्ट माणसे नव्हे तर दुष्ट माणसांची दुष्ट बुध्दी नष्ट व्हावी'.

त्याप्रमाणे माणूस नव्हे तर माणसाची स्वार्थी बुध्दी नष्ट व्हावी असे नलग्यांना वाटते.

कोणत्याही एका वादाने किंवा राजकीय विचार प्रणालीने स्वार्थ निर्मूलनाचे काम होणार नाही. तर माणसांची विवेचक शक्ती आणि विवेक शक्ती त्यासाठी विकसित करावी लागेल. आर्थिक निर्मूलन झाले तरच समाज सुधारेल पण हे एक स्वप्नरंजनच आहे असे नलगे यांना वाटते.

**कौटुंबिक विचार :-**

आजच्या समाजाने कुटुंब व्यवस्था मोडीत काढली आहे. एकत्र कुटुंब पध्दतीचा मोठया प्रमाणात -हास होत आहे. त्याचप्रमाणे अलीकडे नात्यातील ओलावाही कमी झालेला आहे. आई-वडील, भाऊ-बहीण यांच्यात पूर्वीइतकी आत्मियता राहिली नाही. परंतु आत्मियता हा अंतरीक धागा जपणे फार महत्वाचे आहे. अशा प्रकारे प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी आपले संपूर्ण जीवन शैक्षणिक लेखनामध्ये व्यतित केले आहे.

**प्रा. नलगे यांचे शैक्षणिक कार्य :-**

नलगे हे मराठीतील मान्यवर लेखक असून ते समीक्षक, विचारवंत, वक्ते आहेत. त्यांचे वय अठ्ठावन वर्षे 4 महिने आहे. त्यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून कार्य केले. मुख्याध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले. मराठी विभाग प्रमुख म्हणूनहि त्यांनी काम केले आहे. नलगे यांचा महाविद्यालयीन अनुभव तेवीस वर्षाचा आहे. त्यांनी पदव्युत्तर अध्यापन सहा वर्षे केले आहे. तसेच पी. एच. डी. साठी ही त्यांना गाईड म्हणून मान्यता मिळालेली आहे. नलगे यांचा अन्य विद्यापीठाचे एम. फिल, पी.एच.डी. झालेल्या तज्ञाशी परिचय आहे. शिवाजी

विद्यापीठ पातळीवर अधिष्ठाता म्हणून नलगे यांनी कार्य केले आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून नलगे यांनी कार्य केले आहे. विधी सभा तसेच विव्दत सभा सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. कला विद्याशाखा सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. प्रकाशन समिती, विद्यापीठ संशोधन आणि अनुदान समिती यावर कार्य केले. ग्रंथालय परीक्षा पध्दती यामध्ये ही नलगेंनी कार्य केले. शिक्षक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले आहे. शिक्षक निवड यावर त्यांनी कार्य केले आहे. अशा अनेक वीस समित्यांचे ते सदस्य होते.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे चिटणीस म्हणून नलगे यांनी कार्य केले आहे. 'कमवा व शिका' या योजनेचे प्रमुख म्हणून कार्य केले. भटक्या कांजारभाटाच्या मुलांसाठी नलगे यांनी शाळा काढली. शिक्षणसंस्था संस्थापक सचिव म्हणून कार्य केले. डोंगरी मागासलेल्या भागात महाविद्यालय, माध्यमिक विद्यालये व मोफत वसतिगृह सुरु केली. प्रौढ शिक्षणविषयक कार्य त्यांनी केले आहे. तसेच अनेक गावांचा साक्षरता ग्रामगौरव केला. महाराष्ट्र राज्याच्या प्रौढ शिक्षण संस्था यावर त्यांनी कार्य केले आहे. विद्यामंडळ तसेच लोकशिक्षण मासिक व लोकसंख्या शिक्षण इ. समित्यांचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणविषयक त्यांनी कार्य केले आहे. राज्य पातळीवरील समितीवर काम केले आहे.

त्यांनी सातारा व वर्धा येथे नवीन शिक्षक वेतनश्रेणी संदर्भात काम केले आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व कर्नाटक या राज्यातील विद्यापीठांना बी.ए., एम.ए.च्या अभ्यासक्रमानुसार पुस्तक निर्मिती करण्यात त्यांनी भागीदारी केली आहे. संशोधनपर ग्रंथ तसेच समीक्षा, कथा, कादंबरी, कविता व ललित गदय, एकांकिका, चरित्र, बालवाङ:मय, प्रौढ वाङ:मय, संपादन ग्रंथ अशा विविध वाङ:मय प्रकारातील त्यांची पुस्तके प्रसिध्द झाली आहेत. नलगे यांनी शासनाच्या विविध समित्यांवर काम केले आहे. त्यांनी विद्यामंडळावर सदस्य म्हणून कार्य केले आहे. महाराष्ट्रराज्य पाठयपुस्तक निर्मिती बैठकांना तज्ज्ञ म्हणून नलगे उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य नवलेखन शिबिराचे संचालक म्हणूनहि त्यांनी कार्य केले आहे. नाटय स्पर्धेचे परीक्षक तसेच मान्यवर परिषदांवर त्यांनी काम केले आहे.

महाराष्ट्र साहित्य सभा, पुणे तसेच दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, महाराष्ट्र राज्य

ग्रामीण साहित्य परिषद इ. चे संपादक म्हणून त्यांनी कार्य केले आहे. तसेच महाराष्ट्र साहित्य पत्रिका, व दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, मोगरा यांचे संपादक म्हणून कार्य केलेले आहे. युगांतर, लोकशिक्षण इ. चे संपादक म्हणून कार्य केले. या सर्वांना एकूण सात पारितोषिके प्राप्त झाली आहेत. विविध पुस्तकांना शासनाचे तीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

त्यांना, महात्मा फुले वाङ:मय पुरस्कार, कै. वि.स. खांडेकर पुरस्कार तसेच शिवाजी विद्यापीठाचा पुरस्कार व दैनिक सत्यवादी पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सामाजिक प्रबोधनासाठी नलगे यांनी चित्रपटांची निर्मिती केली आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ग्रंथातून देखील चंद्रकुमार नलगे यांच्या गौरवपूर्ण नोंदी केलेल्या आहेत.

उदा. रेफरन्स एशिया, एशियन रायटर्स हुज हू 1986, लर्नेड इंडिया 1984, बायोग्राफी इंटरनॅशनल 1993 व महाराष्ट्र सारस्वत ग्रंथ भाग 2 मध्ये नोंद केली आहे. अर्वाचिन मराठी वाङ:मय इतिहास यामध्ये देखील नलगे यांच्या कार्याची नोंद आहे. अनेक साहित्य संमेलनाचे, परिषदांचे अध्यक्ष म्हणून कार्य नलगे यांनी केलेले आहे. समाज प्रबोधनासाठी विविध विषयावर व्याख्याने नलगे यांनी दिली आहेत. दक्षिण महाराष्ट्रातील नव्या पिढीवर संस्कार त्यांनी केले आहेत. त्यातील अनेक नामवंत विद्यार्थी व शिक्षक तसेच लेखक, कवी आणि समीक्षक, विचारवंत समाजात मान्यता पावले आहेत. अध्यापनात नलगे यांनी विविध प्रयोग केले आहेत.

चंद्रकुमार नलगे यांच्या साहित्यावर विविध विद्यापीठातून एम. फिलच्या प्रबंधासाठी अभ्यास केला गेला आहे. त्यांच्या काही कथांचा इंग्रजी, हिंदी, फ्रेंच भाषेत अनुवाद केलेला आहे. ग्रामीण मनाची हळूवार स्पंदने टिपणारे हे लेखक असून अभिजात ग्रामीण ललित वाङ:मयाचा प्रारंभ नलगे यांनी केला आहे.

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षक म्हणून काम करीत साहित्य सेवाही करीत राहिलेले आणि आता शिवाजी विद्यापीठाच्या कला विद्या शाखेचे अधिष्ठाता असलेले प्रा. चंद्रकुमार नलगे हे नेहमी प्रसिध्दीपासून अलिप्त असतात. त्यांनी साहित्य क्षेत्रात तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात खूप काम केलेले आहे. त्यांची आजपर्यंत सदतीस लहानमोठी पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत. तरीही त्यांना कधीच गर्व झालेला नाही. अशा निगर्वी, विद्‌वान व प्रसिध्दी पराङ्मुख प्रा.

चंद्रकुमार नलगे यांचा प्रा. अनुराधा गुरव यांनी परिचय करुन दिला आहे. या परिचयातून प्रा. नलगे यांचा शैक्षणिक मोठेपणा स्पष्ठ दिसून येतो.

साहित्य क्षेत्रामध्ये स्वतःच्या पायावर समर्थपणे उभी असलेली एक आदरणीय व्यक्ती म्हणजे प्रा. चंद्रकुमार नलगे हे आहेत. मराठी साहित्य क्षेत्रामध्ये स्वतःच्या 'पट्यावर' प्रखर प्रकाशझोत टाकणा-या काही एजन्सीज अस्तित्वामध्ये आहेत. त्यापैकी हे एक आहेत. येन केन प्रकारने प्रसिध्दी मिळविणा-या, गाजावाजा करवून घेणा-या, आरती ओवाळून घेण्यासाठी यंत्रणा निर्माण करणा-या लेखकांच्या पार्श्वभूमीवर नलगे सरांचे अबोल अलिप्त आणि आदरणीय व्यक्तीमत्व मनाला मोहक वाटते. एखादा 'शो' करण्याची, स्तुती करुन घेण्याची हाव नसणारे प्रा. नलगे अनुकरणीय आदर्श वाटतात. त्यांच्या राजस, सालस, आणि सात्विक व्यक्तिमत्वाचा एक आगळा वेगळा प्रभाव पडतो. व समोर असलेल्या माणसाच्या चंचल विकलमनाला स्थिरता प्राप्त करण्यास मदत करतो. अभिनिवेष, आवेश व अहंकाराशिवाय असलेल्या व्यक्तीचे संवादामध्ये जेवढयात तेवढे सहभागी होणारे, 'अस्सं ? होय का ? व्वा' छान ...... छान' अशा शब्दांनी प्रतिसाद, उत्तेजन देऊन समोरच्याला बोलते ठेवणारे, कितीही घाईत, कामात मग्न असले तरी घरी आलेल्या माणसाशी आपुलकी दाखवितात. त्यांच्या सहवासामध्ये येणा-यांचे ते जवळचे मित्र बनून जातात. स्वतःचे दुःख, सुख, व्यथा, विवंचना, खेद, खंती, अडचणी, प्रश्न मोकळेपणाने त्यांना सांगावसे वाटतात. मित्र मंडळीच्या जीवनाच्या वाटेवरचे अगदी सहजतेने ते एक सांगाती बनून जातात. त्यांच्याशी ते एकरुप होऊन जातात.

दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन पार पाडताना अत्यंत शांतपणे वावरताना युवक - युवतींना मार्गदर्शन करीत असताना एवढया मोठया कार्याचे यजमानपद भूषविताना नलगे निवांतच वाटतात. स्टेजवरचे आपले अस्तित्व श्रोत्यांच्या नजरेत भरावे म्हणून हास्यास्पद, विचित्र, संतापदायक, कधी कधी केविलवाण्या क्लृप्त्या लढविणा-या लेखकापेक्षा प्रा. नलगे सरांच्या त्या तेवढया अस्तित्वाचे फार आश्चर्य वाटते.

इस्लामपूरला कथा-कथनांचे अध्यक्ष असता ते त्यांनी वेळेचे भान राखून कथाकथन टाळलेच. एकदा प्रकाशन समारंभ, परिसंवाद चर्चासत्रे इ. द्वारा नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध

करुन देतात. नवीन लेखकांची पिढी 'उभी' राहावी म्हणून प्रयत्नशील, असणारे प्रा. नलगे सर आपण 'किंगमेकर' अथवा 'उस्ताद' असल्याचा अविर्भाव, कधीच आणत नाहीत. आपल्या स्नेहयांना, युवकांना 'लिहिते' ठेवण्याची त्यांची साधी पध्दती मनाला आवडते.

दै. पुढारी सारख्या जनमाणसामध्ये विशिष्ट स्थान असलेल्या, जुन्या परंपरा लाभलेल्या जनप्रिय दैनिकाच्या रविवार आवृत्तीतील पुरवणीचे कार्यकारी संपादक म्हणून संपादनाची धुरा वाहताना, साहित्याची निवड अत्यंत वस्तुनिष्ठ, चिकित्सक आणि सूक्ष्म दृष्टीने मूल्यमापन करुन ते करत. लेखांचे विषय, मर्यादा, दै. पुढारीच्या धोरणात्मक चौकटीशी सुसंगता आदी संबंधी सर अत्यंत दक्ष असत. सुप्रसिध्द लेखकांनाही गोड शब्दात पण सुस्पष्टपणे तशी जाणीव ते देत. विविध दीपावली अंकाच्या संपादनाची जबाबदारी पार पाडीत असून स्वकौतुकाचा एक शब्दही त्यांच्या बोलण्यामध्ये आढळत नाही.

ग्रामीण, नागरी, दलित, ललित इ. साहित्य प्रकार त्यांच्या लेखणीने प्रसवले असले तरी कसलाच रबरी शिक्का त्यांनी उठवून घेतलेला नाही. विशेष 'ट्रेंड' अथवा 'स्कूल' च्या जनकत्वाच्यासाठी खटपट - लटपट कधीच केली नाही. 9-10 कथासंग्रह, 5-7 कादंब-या, चरित्रे, एकांकिका, नाटिका, शब्दचित्रे, दीर्घकथा, काव्यसंग्रह, बाल वाङ:मय, समाजचिंतनपर लेख, ललितरम्य लेख, समीक्षणे इ. विविध साहित्य त्यांच्या नावावर आहे. त्यांचे लेखन वाचत असताना त्यांची उत्स्फूर्तता जबरदस्त अविष्कार, शक्ती, प्रगल्भ प्रतिभा, रसाळ निवेदनशैली, स्वाभाविक भाषाशैली, कल्पनाविलास, शब्दांची वेचक निवड, शब्दलाघव, तरल संवेदनक्षमता, हळवे, मृदू मन, इ. चा प्रत्यय प्रकर्षाने त्यांच्यामधून दिसून येतो.

जीवनातील प्रत्येक अनुभवाला टिपणारी, आपलेसे करुन घेणारी त्यांची प्रतिभा 'दिंडी' काव्यसंग्रहामध्ये भरारी घेते. विपुल लेखन करुनही त्यांचे लेखन बटबटीत, ढोबळ, उथळ, जादुगाराच्या पोतडीसारखे, पृष्ठीय पातळीवर तरंगत ठेवणारे नाही. त्यांचे शब्द पारदर्शक, नितळ, निव्वलसंक पाण्यासारखे आहेत. भाषा सहजता, साधेपणा आणि लाघवपूर्णता, परिपुष्ट अशीच दिसून येते.

या समर्थ लेखकाच्या समृध्द लेखणीचा हेवा वाटावा, एवढे मनोवेधक विविध साहित्य प्रकारांचे लेखन संग्रह त्यांच्या नावावर जमा झाले आहेत. आपली वास्तू, माणसे, निसर्ग, माती, परिसर इ. सा-या सा-यावर जीव जडविणा-या प्रा. नलगे सर्वांनी जीवनातील प्रत्येक क्षण शब्दांच्या शिंपल्यामध्ये बध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. 'आसू आणि हसू' या युती प्रमाणे समान मानण्याची भूमिका पत्करली आहे. तक्रार, गा-हाणी, विरोध, निषेध, आक्रोश आणि विद्रोह या पाय-यांवरुन धावत सुटावे असे अनेक अनुभव येऊनही न पेटता, न भडकता, जीवनातील दुःख, अवहेलना, अपमान, फसवणूक यांचे जबरदस्त दर्शन घडवणारी त्यांची सुजाण, समंजस, समतोल लेखणी मनाला थक्क करुन जाते.

नलगेंची वाणी रसाळ आहे. अभ्यास आणि व्यासंग यामुळे परिपुष्ट आहे. तल्लख बुध्दी लाभलेल्या गृहस्थाने लहानपणासूनच सर्व त-हेच्या अभावांशी झगडत अनेक परीक्षांमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत, प्राथमिक शिक्षकाची नोकरी करीत, पदव्युत्तर परीक्षा शिष्यवृत्ती मिळवित दूरचा पल्ला गाठला आहे. त्यांच्या अनेक कथा, निबंध, बुध्दीमत्ता चाचर्णीना प्रथम क्रमांक लाभला आहे.

प्राथमिक शिक्षक म्हणून ग्रामीण भागामध्ये काम करीत असताना 'अंगाई' नावाच्या चित्रपटाचे निर्माते म्हणून पारितोषिक प्राप्त झाले आहे. 'देवकी' चित्रपट प्रसिध्दीच्या मार्गावर आहे. सत्यकथावर आधारित असलेल्या या चित्रपटांना प्रेक्षक अमाप गर्दी करतो. त्यांच्या काही कथा, काव्यसंग्रह इंग्रजी आणि जपानी भाषेत अनुवादित झाले आहेत.

समर्थ लेखक, जबाबदार संपादक, साहित्यिक, वैचारिक चळवळीचा परिपक्व नेता, आस्खलित वाणीचा व्याख्याता, प्रज्ञावंत विद्यार्थी, कानसा खोरे शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक, संस्थापक व सचिव म्हणून मागास भागात शिक्षण संस्था उभ्या करणारे, शिव शाहू महाविद्यालय, सरुड सारख्या आडगावी चालविणारे शिक्षण प्रेमी, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक यापेक्षा आपल्या जन्मभूमीशी सचेतन नाते सांगणारे व जपणारे प्रा. नलगे अधिक जवळचे वाटतात.

पुण्या मुंबईच्या अल्ट्रामॉडर्न फ्लॅटस् मध्ये राहून ग्रामीण जीवनामध्ये पाळेमुळे रुतलेली

12717

आहेत. माझी आस कंठशोष करणारे आणि अत्त्युच्च वर्णीय प्रकाशनाकडून वर्णी लागले की बेचाळीस पिढयांचा उध्दार झाल्यासारखे आनंदाने बेहोष होणारे तथाकथित ग्रामीण लेखक आणि ग्रामीण जीवनाची अपार जीवंत ओढ असणारे व जपणारे सर यांची तुलनाच होऊ शकत नाही. सन्मित्र, प्रचार इ. सारख्या नव्या प्रकाशनांना सहकार्य करुन थोरामोठया प्रकाशकांच्या पिच्छा न पुरविणारे लेखक म्हणूनही ते अनुकरणीय वाटतात.

गाजवून घेण्याचा मोह कटाक्षाने टाळून काम करणे हा त्यांचा स्थायी भाव. प्रा. नलगे यांची निवड शिवाजी विद्यापीठाच्या कलाविद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून झाली.

प्रा. नलगे सरांचे व्यक्तिमत्व एवढे औरसचौरस, बहुढंगी, बहुअंगी असून शब्दबध्द करणे अवघड जाते. त्यांच्या व्यक्तिमत्वाला लाभलेली लोभस रंगछटा म्हणजे त्यांचे कौटुंबिक जीवन. एवढे व्याप ताप सांभाळून स्वतःची उंची प्रतिष्ठितपणे वाढविताना आपल्या मुला-बाळा संसाराला 'खुरटेपणा' येऊ नये, याबद्दल ते दक्ष राहिले आहेत.

प्रा. नलगेंचे कौटुंबिक जीवन एकूण चांगले आहे. पत्नी पुस्तकी विद्या न शिकलेली तरी नलगेंनी आपल्या सहधर्म चारिणीला बरोबरीने, मानाने, विश्वासाने वागविले आहे.

प्रा. नलगे यांचे लेख, कथा, कांदबऱ्या, ललित वाङ:मय, समीक्षा ग्रंथ इ. साहित्य प्रकाशित झालेले आहे. या प्रकाशित साहित्याचा तक्ता पुढे दिलेला आहे.

## प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे प्रकाशित - साहित्य :-

| पुस्तकाचे नांव | : वाङ:मय प्रकार | : प्रकाशन दिनांक | :प्रकाशक व इतर माहिती |
|---|---|---|---|
| 1. सरकारी माणूस | कथासंग्रह | 2.10.60 | शेटये |
| 2. गळफास (बक्षीसपात्र) | नाटिका | 2.10.60 | शेटये |
| 3. स्वामी रामानंद | चरित्र | 2.10.61 | शेटये |
| 4. सर्जा | कथासंग्रह | 2.10.62 | शेटये |
| 5. अंगाई | कथासंग्रह | 2.10.66 | संजय |
| 6. इथे नांदती रामाची लेकरे (बक्षीसपात्र) | समाजचिंतन | 2.10.66 | सरकारी |
| 7. घुंगराच्या तालावर | दीर्घकथा | 2.10.68 | सरकारी |
| 8. रान करवंद (बक्षीसपात्र) | कथासंग्रह | 13.3.71 | शेटये |
| 9. पंढरीची वाट | कथासंग्रह | 13.6.73 | संजय |
| 10. हुरडा | कथासंग्रह | 1.3.74 | शेटये |
| 11. अगीन फुल | कादंबरी | 4.7.74 | संजय |
| 12. शहाळी | कादंबरी | 15.8.75 | संजय |
| 13. काफिला | कादंबरी | 22.2.75 | अजब |
| 14. कहाणी तुझी माझी | संपादन | 2.10.75 | अजब |
| 15. गस्त | कादंबरी | 24.10.76 | ओंकार |
| 16. गुरुसाक्षात परब्रम्ह | कथासंग्रह | 14.2.77 | शेटे प्रकाशक |
| 17. अशा अवेळी | कथासंग्रह | 1.8.77 | संजय |
| 18. देवाची साक्ष | कादंबरी | 15.3.79 | विशाखा |
| 19. नंदादीप | बाल-वाङ:मय | 14.3.79 | संजय |
| 20. दलित कथा | संपादन | 26.1.81 | अजब |

| | | | |
|---|---|---|---|
| 21. दिंडी | काव्यसंग्रह | 22.2.81 | शेटये. |
| 22. जलम | शब्दचित्रे | 1.4.81 | सन्मित्र |
| 23. खदखदे,खदाखदा,खदखदे | एकांकिका | 26.1.82 | सन्मित्र |
| 24. आक्रित | कथासंग्रह | 26.1.83 | प्रचार |
| 25. अशीच एक वाट | कथासंग्रह | 26.1.86 | अजब |
| 26. दलित आत्मकथन | संपादन | 26.1.86 | सुरेश एजन्सी |
| 27. गावाकडची माती (बक्षीसपात्र) | ललित लेख | 1987 | सन्मित्र |
| 28. लोकरंग (ललितलेख) | संपादन | मे. 88 | सुरेश एजन्सी |
| 29. चंद्रबनातल्या सावल्या | ललित लेख | 1989 | सुरेश एजन्सी |
| 30. स्त्री आत्मकथन | संपादन | 1989 | सुरेश एजन्सी |
| 31. मराठी साहित्याचे उदयरंग | समीक्षा ग्रंथ | 1990 | सुरेश एजन्सी |
| 32. मंतरकैफ | ललीतलेख | 1990 | प्रचार |
| 33. महाराष्ट्रातील सामाजिक विचारमंथन. | संपादन | 1991 | सुरेश एजन्सी |
| 34. दारकोंड | कथासंग्रह | 1994 | प्रचार |

' ग्रामीण साहित्य :- अपेक्षा आणि उपेक्षा यावर त्यांनी अध्यक्षीय भाषण दिले आहे. 'ग्रामीण वाङ:मयाचा इतिहास' यांचे संपादन केले असून 'झुंझरुक' हा ललितलेखही प्रकाशित झाला आहे.

---

प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या वरील प्रकाशित साहित्यापैकी, 'देवाची साक्ष' आणि 'अगीनफूल' या दोन कादंबऱ्यांचा सखोल अभ्यास पुढील प्रकरणातून करण्यात आला आहे. त्यांच्या कथा आणि कविता या वाङ:मय प्रकाराचा अभ्यास येथे देण्यात आला असून त्या अभ्यासातून त्यांच्या लेखन प्रवासाचा आलेख पाहिला आहे.

## प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा लेखन प्रवास :-

सन 1989 मध्ये प्रकाशित झालेला 'चंद्रबनातील सावल्या' हा प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा 16 ललित लेखांचा संग्रह, धड लेख नाही, धड आठवणी नाहीत, धड कथा नाहीत, धड लघुनिबंध नाहीत असा हा मुक्त होऊ पाहणारा, स्वैर स्वरुपाचे चिंतन करणारा एक नवा वाङ:मय प्रकार स्थूल मानाने 'ललित' म्हणून ओळखला जातो. लेखकाच्या व्यक्तिगत एकांतातील ते काव्यमय चिंतनच असते. त्यामुळे व्यक्तिगत लेखक, एकांतातील चिंतन आणि काव्यात्मकता यांची झाक अशा लेखामध्ये दिसून येते. या काव्यमय चिंतनाला जीवन वास्तवाबरोबरच निसर्गाचाही स्पर्श होत असतो. चिंतनातील उदात्तता, भव्यता, स्वप्नमयता, काव्यमयता यांचा पाझर अशा लेखांमधून अपरिहार्यपणे होताना दिसतो.

साधारणत: भावनात्मकता व निसर्ग हे ललित लेखातील अविभाज्य घटक असतात. कारण आत्मचिंतन भावनिक प्रश्नांचेच होत असते. अशा भावनिक प्रश्नांच्या ओघानेच मग त्याचे स्वरुप सामाजिक, राजकिय, धार्मिक व इतर पातळयावर घसरते.

भावनात्मक पातळीवरुन येणारा अनुभव व त्यांच्या जोडीला येणारा निसर्ग यामुळे ललित लेखात मोठया प्रमाणात काव्यात्मक आढळते. या काव्यात्मकतेतच कधी कथाबीज दिसून येते, तर कधी नाटयमय घटनांची नोंद जाणवते.

'चंद्रबनातल्या सावल्या' या संग्रहातील ललितांनी,' ललित लेख' या वाङ:मय प्रकारातील विकासाचं पुढच पाऊल गाठलं आहे. या लेखात एकाच अंत:सुत्राचे चिंतन असून लेखकाने आपल्या बालपणी आलेल्या ग्रामीण जीवनात अनुभवलेल्या अनेक घटना, प्रसंगाचं स्वत:च पुनर्दर्शन घेताना केलेले चिंतन आहे.

'चद्रंबनातील सावल्या' तील ललितामधून ग्रामीण जीवनाच्याभाव विश्वाचे व ग्रामीण लोक जीवनाचे ज्या साकल्याने चित्रण झाले आहे, तेवढयाच समर्थपणे ग्रामीण जीवनात अविभाज्य असणारा निसर्ग देखील जीवंत होऊन आलेला आहे. या ललिताचं लेखन हेच मुळात लेखकाच्या बालपणीच्या गावाकडील घटना, प्रसंगाचं चित्रण असल्यानं ग्रामसंस्कृती व ग्राम संकृतीशी संबंध

असलेला निसर्ग व बालमनाला भावलेल्या व निसर्गाच्या विविध छटा स्वरुप या लेखामधून अवतरलेली आहेत. पाऊस, पशु, पक्षी, झाडं, हिरवीगर्द शेतं, फुललेले मळे आणि इतरही सर्व त-हेच्या निसर्ग व्यवहारांची चित्रणं या लेखामधून पाहावयास मिळतात.(2).

'बघता बघता आकाशातील ढगांच्या पुंजक्यातून कुणी गंधर्व उतरावेत तसे पांढरे बगळे उतरतात. जणू पांढरे कोंबच ओल्या मातीतून तरारुन आलेत. प्रभू रामाची सेना ही झाडामागे झाडे टाकीत इथं येऊन दाखल होते. बांधावरच्या, आंब्यावरच्या खारोटीने दिलेल्या निमंत्रणाप्रमाणे रानावनातून पाखरं केव्हाच आंबेदाखल झालेली असतात. लाल झुपकेदार सरडयांची धावाधाव कुंपणापर्यंत चालू असते. गावातली विमानपंखी घोडे उगीच इकडून तिकडे तरंगत असतात. (पा.न.7) (3).

अशा प्रकारे निसर्ग चित्रणं या लेखांमधून दिसून येतात.

बहुतांशी लेख हे लेखकाच्या बालपणीच्या जगलेल्या जीवनाच्या चिंतनावर आधारीत आहेत. बालपणी लेखकाने जी माणसं पाहिली, निसर्ग पाहिला व डोळयात साठविला त्याची चिंतनात्मक व मननात्मक पुन:निर्मिती या पुस्तकातील लेखांमधून होताना दिसते. लेखकाचं बालपण व बालपणीचं दूर गेलेलं मंनोरम जग लेखक विसरु शकत नाहीत. परंतु बालपणातील त्या जीवनातील 'चंद्रबनाच्या सावल्या' मात्र लेखकाच्या स्मृतीवर आपले गडद ठसे उमटवून गेल्या आहेत.

'मस्करीचे दिवस' या लेखात गुराख्यांच्या जीवनातील थट्टा मस्करीनं भरलेल्या खेळाचं चित्रण लेखकाने अगदी सहजतेने केले आहे. तर 'झपाटलेले रान' या लेखात शिव शेजारच्या पडीक जंगली रानाचं व त्या रानाच्या संबंधानं येणा-या लहान सहान संदर्भ बाबीचे मनोज्ञ चित्रण आलं आहे.

'बाद' या झाडाझुडपांनं गच्च भरलेल्या व भयानकता प्रदान करणा-या जंगली रानातील वैशिष्टय पूर्ण भेसूरता या लेखातून स्पष्ट होते.

'गावाकडच्या जत्रा' या लेखातून महाशिवरात्रीच्या जत्रेसंबंधी सविस्तर वर्णन आलेले आहे. यात जत्रेतील तमाशा व तमाशा शौकीन असा महत्वाचा किस्सा आलेला आहे. वगनाटय व या नाटयाची थोरवी, त्यातील महत्वपूर्ण मुद्यांच लेखकाने वर्णन केले आहे.

' हवेतले झोके ' या लेखात शिमग्याच्या सणासंबंधी व पुढे मोहरमच्या सणासंबंधी विधित्मक वर्णन आलेले आहे. 'एक शापित स्वप्न' या लेखात कंठेश्वराच्या तळयाचं आणि तळयासंबंधी संदर्भाचं यथोचित वर्णन आलेले आहे.

अशा प्रकारे सर्वच लेखांमधून मानव आणि निसर्ग यांच्या परस्पर सम्यक अशा अनेक घटना चित्रित झाल्या आहेत. या संपूर्ण लेखांमधून येणारा निसर्ग जसा वैविध्याने नटलेला आहे. त्याचप्रमाणे 'चंद्रबनातल्या सावल्या' तील व्यक्ती वैविध्यपूर्ण वृत्तप्रवृत्तीचं वैशिष्टये घेऊन आलेल्या आहेत. बालवयातला लेखक, ताई, अक्का, तमाशाचे शौकीन, दादा, किर्तनकार बुवा, मामांजी, हारबा, गणपा, तानाक्का, राऊदा, सित्या, सखामामा, गुंजाबुवा, पांडुबुवा, कुशाबुवा, गणेश गवंड ही माणसे अतिसामान्य असून सुध्दा या लेखांमधून त्यांच स्वत:च असं असामान्यत्व चित्रित झालं आहे. ही माणसं स्वत:चे विशेष जपतानाच आपला ग्रामीण समाज व त्याबरोबर आलेल्या निसंर्गाशी देखील एकरुप झालेले आहेत.

या ललित वाड:मय मधून वेगवेगळया प्रकारच्या ग्रामीण रीतीभाती, श्रध्दा-अंधश्रध्दा व जत्राखेत्रामध्ये सणावाराचे स्वरुप देखील चित्रित झाले आहे.

ललित लेखांसाठी अत्यावश्यक असणारी ललितमय भाषा ही अति महत्वाची आहे. या लेखातील प्रतिकात्मक आणि प्रतिमात्मक आणि प्रतिभात्मक भाषेमुळे लालित्य वाढलेले दिसून येते. सहज सुंदर व औचित्य साधणारी भाषा आणि त्यातून अर्थ प्रवाहिनता साधण्यासाठी आलेली प्रतिमासृष्टी यामुळे प्रा. नलगे यांच्या लेखनाची भाषिक श्रीमंती वाढलेली आहे.

उदा:

'ढगांच्या पुंजक्यातून कुणी गंधर्व उतरावेत तसे पांढरे शुभ्र बगळे शेतात उतरतात.'

'दु:ख सांगण्यात सांज परतून जायची'.

'पाण्याची दऱ्यात विरत जाणारी धुन, तळयाच्या काळजांच पाणी करते'. इत्यादी मधून

भाषिक प्रतिमांची स्पष्टता या संग्रहातून झालेली दिसून येते.

त्याच बरोबर अनेक नवे शब्दबंध या संग्रहातील भाषेतून आलेले दिसतात.
उदा:- ' हवेतील झोके', 'झोटींग वारा', 'गवती रान', बाभळ एके बाभळ' पितळी देव', 'तांबडी तालीम', 'अक्षरांच बेट', 'शापित स्वप्न', ' चंद्रबनातल्या सावल्या', ' रेशीम कापूस', ' लाजरी पापांद' इत्यादी.

अशा नव्या शब्दबंधामुळे या लेखांची भाषा सामर्थ्यशाली बनली आहे.

एकंदरीत मराठी लेखनामध्ये चंद्रकुमार नलगे यांनी 'ग्रामीण ललित लेख' या स्वरुपाचं पुढचं पाऊल टाकलं आहे. सर्वच पातळीवरुन हे लेख स्वतःच असं सामर्थ्य व स्वतंत्र स्वरुप घेऊन आलेले आहेत. कथात्म, काव्यात्मक आणि नाटयात्म स्वरुपातल्या ग्राम अनुभवाचं कलात्मक चिंतन या लेखांमधून आलेलं असल्यांन या लेखातून प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या सामर्थ्यशाली ललित लेखनाचा प्रत्यय येतो.

प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा 'दिंडी' हा काव्यसंग्रह सन 1981 मध्ये प्रकाशीत झाला.(4). या संग्रहामध्ये त्यांनी एकूण एकेचाळीस काव्य पुष्पे गुंफली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अद्यात्मक, निसर्ग, प्रेम आणि दु:खमय जीवन इत्यादि विषयावरील कवितांचे लेखन केले आहे.

' दिंडी, वीट ढळते पायीची, कथांतर, प्रेषित आणि कोणी पेरिली ही नशा' या काव्यातून अध्यात्माचे, संत वाङ:मयाचे दर्शन दिसून येते. देवाला गा-हाणे सांगून ही नशा कोणी पेरिली आहे. याचा जाब कवींनी देवाजवळ व्यक्त केला असून देहू, आळंदी, पैठण या क्षेत्रात वावरलेल्या संत तुकाराम, ज्ञानेश्वर आणि एकनाथाच्या पालख्यांबरोबर जाणा-या 'दिंडीत' माणसाच्या माणुसकीपेक्षा दुष्ट प्रवृत्तींच्या माणसांचा भरणा जास्त प्रमाणात दाखविण्यात आला आहे. श्री. विठ्ठलाच्या दर्शनाला पंढरीला जाणा-या भक्ताजवळ जनाबाई सारखा भक्तीभाव आणि तुकारामासारखे वेड ही दिसून येत नाही. त्यामुळे पांडुरंगाच्या पायाखालील वीट ढळते आहे की काय अशी रास्त शंका मांडण्यात आली आहे. महाभारतासारख्या कवितेमधून ज्याप्रमाणे वाल्याकोळयांने आपल्या अंगाखांदयावर वारूळ वाढवून घेतले आणि रामायण रचले त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनातील दु:खाद प्रसंगाला तोंड देत संपूर्ण जीवनभर महाभारतातील व्यक्तीरेखा

प्रमाणे जगावे लागते, असा दाखला देण्यात आला आहे. 'कथांकर या कवितेमधून सध्याच्या समाजाचे दारुण चित्र दाखविण्यात कवी यशस्वी झाले आहेत. जाता येता काळाबाजार करणारे, लुबाडणारे, अत्याचार करणारे, एखाद्याला किडया-मुंग्या प्रमाणे मारणारे गुंड, मवाली, स्मगलर्स यांचे वर्णन पुर्वार्धात केले आहे. त्यासाठी त्यांनी 'मटकाकिंग' हा शब्द वापरला आहे. उत्तरार्धात विश्वाची चिंता करणारे श्री. समर्थ रामदास बोहले सोडून गेल्यानंतर त्यांची सौभाग्यकांक्षिणी त्यांची वाट बघण्यात संपूर्ण जीवन व्यथित करते. त्याप्रमाणे सुखासमाधानासाठी माणूस प्रतिक्षा करत करत जीवन जगतो. या विषयीचा दाखला देण्याचा प्रयत्न या कवितेतून करण्यात आला आहे.

'सांज, खळयामळयाचे गीत, स्वप्नवेडी, पेटल्या आकांशा, माहेराच्या वाटेवरी, वेध लागला दुरीचा, अनंतन, क्षण, वळीवा, या काव्यांतून निसर्गाचे सौंदर्य दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. विविध प्रकारच्या पाना-फुलांचे, नद्या-नाल्यांचे, उन-वारा, पाऊस, रानामाळाचे, विजा लकलकाटीचे, मेघगर्जनांचे, पाऊल-वाटांचे, कडया-कपारींचे, पशु-पक्ष्यांचे यथोचित वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्गाची रम्यता, भेसूरता, आक्रांळ विक्राळ रुप दाखविण्यात आले आहे.

'दिडी' या काव्यसंग्रहातील ' सांज' या कवितेतून निसर्ग वात्सल्य दिसून येते. 'स्वप्नवेडी' या कवितेत कवीला एका सकाळचे स्वप्न पडले असून त्यांनी मोगरा, जास्वंदी, तुळस, जाई,जुई या पानाफुलांना शब्द रुप देण्याचा प्रयत्न केला असून स्वप्नाला मनोविश्लेषण तत्वानुरुप सूक्ष्म, प्रतिकात्मक अर्थ आणि त्याचा सहचरी भाव कलात्मक दृष्टया या कवितेतून अभिव्यक्त करण्यात आला आहे. 'माहेराच्या वाटेवरी' या कवितेत सासरहून माहेरी जाणा-या सुवासिनीच्या बालपणाच्या आठवणी व्यक्त केल्या आहेत. उदा. 'भातुकली - बाहुलीचा, खेळ घरात दारात'

नांदत्या त्या सोनुलीचा, भरे पालव मनात'(5).

'वेध लागला दुरीचा' या कवितेत कवींनी विश्वाची भेट घेण्यासाठी संदेश दिला आहे तर 'वळीवा' या कवितेत ते पावसाला विनंती करतात की, 'नकोझोडपू वळीवा, रान गेलं रे धुवून. ....

लेकराची आण तुला, नको पाहू असा अंत ।।(6)

अशा प्रकारच्या ग्रामीण परिसर, त्यात राहणारी माणसं त्यांच्या सभोवतालाचा निसर्ग आणि निसर्गाशी त्यांची एकरुपता दर्शविण्यात आली आहे.

'प्रेम' हाही विषय त्यांच्या 'दिंडी' या काव्य संग्रहामधून दिसून येतो. प्रेमाची गीते लिहितांना सुध्दा प्रा. नलगे यांनी 'प्रेम' कवितेमधील कर्तव्ये आणि सामाजिक बांधिलकी सांभाळली आहे. कधि प्रेयसीला सांभाळण्याची तर कधी पत्नीला सजविण्याची प्रतिमा त्यांच्या या कवितेतून दिसून येते. उदा. 'गायच्याच आधी' या कवितेत प्रेयसीचा हट्ट पुरविण्यासाठी गीत रचले आहे. 'आठव' कवितेतून पत्निला आपल्या पतीची आठवण दर्शविण्यात आली आहे. या काव्यात पुढील पंक्तीतून प्रेमाचे प्रतिक स्पष्ट होते.

आठवण होता तुझी, स्मरतात दिव्य क्षण ।
काहूरतं माझं मन, केंव्हा घडेल पूजन ।।(7).

त्याचप्रमाणे 'ओलीसुकी, अनंतन, भिंगोरी, सावली, भटकता रानवन, साक्ष, चंद्र करतोय वीज, संपुष्ट, सोस, गेले मावळून गीत, मी-तूचे बंध तुटे' इत्यादी कवितांतून प्रणय भाव प्रकट करण्यात आले आहेत. ज्याप्रमाणे 'प्रेम जिव्हाळा, ममता, कारुण्य, भक्ती इत्यादी भावात्मक दृश्याची मांडणी या कवितेतून करण्यात जशी त्यांची विवेचनशैली दिसून येते त्याप्रमाणेच 'यातना, दु:ख, भोग, दुर्दैव, इत्यादी दु:खमय भावनात्मक दृश्याचीही मांडणी करण्याची प्रा. नलगे यांची 'दिंडी' या काव्य संग्रहातील काही कवितामधून विवेचनशैली आढळून येते. त्यामध्ये प्रामुख्याने 'सूर्या' दुर्दैव, पाढा, एकदिवस, हुंकार, व्यथा, अंधार यात्रा, अर्थ मला आज कळे, फुटे पाषाणाला कोंभ, छंद, शापित' इ. कवितामधून दु:खी, कष्टी, प्रसंगाची योजना करण्यात आली आहे. 'सूर्या' या कवितेतून सूर्याच्या तप्त उन्हाचे वर्णन केले आहे. 'दुर्दैव' या काव्यांतून नशिबाला दोष देण्याचा प्रयत्न केला आहे. 'पाढा' या कवितेतून आयुष्याची छिन्नविछनता दर्शविली आहे. 'एक दिवस, हुंकार, व्यथा, अंधारयात्रा, अर्थ मला आज कळे' या कवितांमधून कविंनी आपल्या मनातील दु:खी वेदना वर्तविल्या आहेत. 'फुटे पाषानाला कोंभ आणि छंद' या कवितेतून मानसिक यातना स्पष्ट केल्या आहेत. 'शापित' या कवितेमध्ये कवींनी माझा जन्म क्रूर अशा नियतीच्या शापामुळे झाला आहे, असे व्यक्त करण्यात आले आहे. ते या कवितेतील पुढील ओळीतून स्पष्ट दिसून येते.

शाप नियतीचा क्रूर, शापिताचा जन्म मला ।
उ:शापाची नाही शक्ती, शाप शापुनिया गेला ।।(4).

याशिवाय 'पुष्पित' या कवितेतून देशभक्ती आणि स्वातंत्र्यपर गीत प्रकट करण्याची झलक दिसून येते.

अशा प्रकारे लेखक म्हणून प्रसिध्द पावलेले प्रा. चंद्रकुमार नलगे, 'नावाजलेले कवी' म्हणवून घेण्यासही पात्र आहेत. 'दिंडी' या काव्यसंग्रहामधून त्यांची प्रतिभाशक्ती, योजना बध्दता, रचनाचातुर्य आणि मांडणी प्रभावी अशीच आढळते. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या या कविता दीर्घकाळ मनावर रेंगाळत राहतील यात तिळमात्रही शंका नाही. या त्यांच्या काव्य संग्रहातून काव्य सौंदर्य, कवी सामर्थ्य आणि काव्यात्म आणि भावात्म रुपबंध दिसून येतात. या सर्व सामर्थ्यांनिशी त्यांनी लिहिलेल्या दोन कादंब-या ' देवाची साक्ष आणि अगीन फूल' यांचा अभ्यास पुढील प्रकरणापासून करण्यात आलेला आहे.

xxxxxx

## -संदर्भ-


1. प्रा. चंद्रकुमार नलगे यांची दि.11/7/94 रोजी घेतलेली समक्ष मुलाखत.

2. दक्षिण महाराष्ट्र साहित्य, पत्रिका एप्रिल, मे, जून 1993 महाराष्ट्रराज्य साहित्य, संस्कृतीमंडळ पुरस्कृत, पृष्ठ - 37.

3. नलगे चंद्रकुमार, चंद्रबनातल्या सावल्या, पुणे, सुरेश एजन्सी, प्रथमावृत्ती 1989, पृष्ठ - 15.

4. नलगे चंद्रकुमार, दिंडी, कोल्हापूर, शेटयेप्रकाशन, प्रथामावृत्ती 1981, पृष्ठे - 52.

5. तत्रैव : पृष्ठ - 9

6. तत्रैव : पृष्ठ - 30

7. तत्रैव : पृष्ठ - 41

8 तत्रैव : पृष्ठ - 47.


xxxxxx